# LIBRARY & INFORMATION CENTRE

## GIT in NEWS

**Sakal 11-04-2016**

# जीआयटी कॉलेजला विजेतेपद

## व्हीटीयू आंतरमहाविद्यालयीन क्रिकेट स्पर्धा

**सकाळ वृत्तसेवा**

बेळगाव, ता. १० : म्हैसूरमधील एनआयईआयटी कॉलेजच्या मैदानावर नुकत्याच झालेल्या व्हीटीयू आंतरमहाविद्यालयीन राज्यस्तरीय क्रिकेट स्पर्धेत बेळगावच्या जीआयटी कॉलेजने विजेतेपद पटकाविले.

राज्यस्तरीय व्हीटीयू आंतरमहाविद्यालयीन क्रिकेट स्पर्धेत पहिल्या सामन्यात जीआयटी कॉलेजने दावणगिरीचा ९४ धावांनी पराभव केला. दुसऱ्या सामन्यात एटीएमए कॉलेज म्हैसूरचा ५ गड्यांनी, उपांत्य सामन्यात बंगळूरच्या बीएमएससीई कॉलेजचा ८ गड्यांनी तर अंतिम लढतीत एमएसआरआयटी कॉलेज बंगळूरचा ९ गड्यांनी विजय संपादीत करीत विजेतेपद पटकाविले.



**बेळगाव : व्हीटीयू आंतरमहाविद्यालयीन राज्य क्रिकेट स्पर्धेतील विजेत्या जीआयटी कॉलेजचा कर्णधार सुमंत वेलिंगने पाहुण्यांच्या हस्ते चषक स्वीकारला. शेजारी पी. व्ही. कडदकाई आदी.**

विजेत्या संघात कर्णधार सुमंत वेलिंग, केतज कोल्हापुरे, नागेंद्र पाटील, मुक्तीनाथ चिनवाळ, प्रशांत होनगेकर, कैफ जमादार, तेजस पवार, नोएल डिमेलो, अरिहंत अमणाजी, शुभर हेरेकर, अभिषेक देसाई, विनित नाईक, वरुण मण्णूरकर, सुयश खोत, गौतम कामत, शिरीष राणोजी यांचा समावेश होता.

संघाला कॉलेजचे क्रीडाप्राध्यापक पी. व्ही. कडदकाई, क्रांती कुरणकर यांचे मार्गदर्शन तर जीआयटी कॉलेजचे गव्हर्निंग कौन्सिलिंग अध्यक्ष उदय कालकुंद्रीकर, जिमखाना अध्यक्ष आर. श्रीधर, प्राचार्य डॉ. ए. एस. देशपांडे व शिक्षकांचे प्रोत्साहन लाभत आहे.